# भारतीय जनता पार्टी, मुंबई

## BHARATIYA JANATA PARTY, MUMBAI

वसंत स्मृती, 3 रा मजला, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पूर्व), मुंबई - 400014
दूरध्वनी : 2418 3290 फॅक्स : 2415 0462 E-mail : bjpmbi@vsnl.net

कृपया प्रकाशनार्थ
FOR FAVOUR OF PUBLICATION

मुंबई - सोमवार, 9 जुलै 2007

**11 जुलै बॉम्बस्फोटग्रस्तांना मदत**
**महाराष्ट्र शासन खोटं बोलत आहे - डॉ.किरीट सोमैया**

महाराष्ट्र शासन धादांत खोट बोलत आहे. 11 जुलै बॉम्बस्फोटग्रस्त 1077 कुटुंबांची सगळया प्रकारची काळजी घेण्याची घोषणा, वचन, प्रतिज्ञा पत्र केल्यानंतर आता ``आम्ही असं कांही बोललोच नाही'' अशा प्रकारचे वर्तन महाराष्ट्र शासन करत असल्याचा आरोप माजी खासदार व भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. किरीट सोमैया यांनी केला आहे.

गेल्या 11 जुलै 2006 रोजी झालेल्या बॉम्बस्फोटाला आता एक वर्ष पूर्ण होत आले आहे. गेले 12 महिने ही 1077 कुटुंब राज्य सरकार, केंद्र सरकार, रेल्वे व पोलीस यांची दारे ठोठावत आहेत. बॉम्बस्फोटग्रस्तांपैकी 416 लोकांना वैद्यकिय उपचार, श्रवणयंत्र, कृत्रीम अवयव, आर्थिक सहाय्य व नोक-या इ. मिळालेले नाही.

बॉम्बस्फोटग्रस्तांना अशा प्रकारची मदत करण्याचे आम्ही कधीही वचन दिले नव्हते. आम्ही फक्त तत्कालिन वैद्यकिय सहाय्यता व हमाल - हेल्परची नोकरी रेल्वेमध्ये देऊ असा अवमान राज्य सरकार, केंद्र सरकार, रेल्वे करत आहे.

``आम्ही बॉम्बस्फोटग्रस्तांना उघड्यावर सोडणार नाही. त्यांचा खाजगी रुग्णालयासह सगळा वैद्यकिय खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे'' आर.आर.पाटील,उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र यांनी विधी मंडळात झालेल्या चर्चेच्यावेळी उत्तर देताना 12 जुलै 2006 रोजी केलेली ही घोषणा.

``आम्ही सगळया मृत व जखमींची काळजी घेऊ. जखमींना वैद्यकिय उपचाराची सगळी व्यवस्था महाराष्ट्र शासन करणार'' मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी 12 जुलै 2006 रोजी केलेली घोषणा.

``जखमींना तत्कालीन वैद्यकिय उपचारांची सर्व व्यवस्था महाराष्ट्र शासन व रेल्वे करत आहे. त्यांना लागणारी श्रवण यंत्रेही देण्याची व्यवस्था राज्य सरकारने केली आहे'' असे राज्याचे मुख्य सचिव श्री डी.के.शंकरन यांनी डॉ.किरीट सोमैया यांनी मानव अधिकार आयोगाकडे दाखल केलेल्या याचिकेला उत्तर देताना 10 ऑगस्ट 2006 च्या प्रतिज्ञा पत्रात नमूद केले आहे.

``हम घायल बम बिस्फोट पीडितों की पूरी वैद्यकिय सहायता करेंगे, मृतकों के परिवार के सदस्य को नौकरी देंगे'' - इति रेल्वे मंत्री लालू प्रसाद यादव (12 जुलै07 पहाटे 2.00 वा.).

11 जुलै बॉम्बस्फोटाला एक वर्ष पूर्ण होत असल्याप्रसंगी 187 मृतकांचे कुटुंबीय व 890 जखमी संबंधीचा एक status Report डॉ.किरीट सोमैया यांनी मुंबईत सादर केला.

- रेल्वे क्लेम ट्रिब्युनल येथे 1077 पैकी 174 निकाल लागून त्यांना आर्थिक सहाय्य मिळाले.
- 225 जखमींना श्रवण यंत्रे, शस्त्रक्रिया, कृत्रीम अवयव इत्यादींची अद्याप गरज आहे.
- 200 लोकांना अजुन आर्थिक सहाय्य मिळावयाचे आहे.
- 235 पैकी फक्त 44 लोकांनाच रेल्वेमध्ये योग्य नोकरी मिळाली.

केंद्र सरकार, राज्य सरकार व रेल्वेने या 1077 कुटुंबांची योग्य काळजी घेऊन सगळे काम 11 जुलै 2007 पर्यंत पूर्ण करावे अशी मागणी डॉ.किरीट सोमैया यांनी केली आहे.

डॉ.किरीट सोमैया, आमदार गोपाळ शेट्टी व श्री पराग अळवणी यांच्या मानव अधिकार आयोगाच्या याचिकेची सुनावणी 25 जुलै रोजी होणार आहे.

प्रसिध्दी सचिव